# बृहन्मुंबईमहानगरपालिका

ईमेल: stenodeanl@gmail.com, dean.ltmg@mcgm.gov.in, फोननं.: 022 24063001 / 02

लोकमान्यटिळकमहानगरपालिकासर्वसाधारणरुग्णालयव

लोकमान्यटिळकमहानगरपालिकावैद्यकीयमहाविद्यालयशीव, मुंबई-२२


क्र. लोटिरु/17367 /अधिष्ठाता, दि. 01.08.2023

## सूचना परिपत्रक

संदर्भ – अति. आयुक्त् (प.उप.) यांचीक्र. AMC/WS/434/D DATE-15.05.2023
अन्वयेची मंजूरी.

लो.टि.म.स.रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील **व्यवसायोपचार** विभागातील सहाय्यक प्राध्यापकाचे 02 पदे भरणे आवश्यक आहे.

.

तरी मा. अति. आयुक्त (प.उप.) यांच्या क्र. AMC/WS/434/D DATE-15.05.2023 अन्वयेच्या प्राप्त मंजुरीच्या अनुषंगाने अर्हताप्राप्त उमेदवारांकडून स्थानिक पातळीवर सदर पदे भरण्यात येणार आहेत.

इच्छुक उमेदवारांनी अर्जासह अधिष्ठाता, लो.टि.म.स.रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, शीव, मुंबई 400 022, यांच्या दालनात सोबत जोडण्यात आलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रत्यक्ष मुलाखतीकरीता उपस्थित रहावे. उमेदवारांनी मूळप्रमाणपत्रे व झेरॉक्सप्रती मुलाखतीच्या वेळी घेऊन यावीत.

**पदाचा तपशीलः-** सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्याचा तपशील खालील प्रमाणे:

| अनु.क्र. | विभागाचे नाव | रिक्त पदे | मुलाखतीची वेळ व स्थान |
|---|---|---|---|
| 1 | व्यवसायोपचार विभाग | 02 | व्यवसायोपचार विभाग<br>दि. 10.08.2023<br>वेळ<br>सकाळी 11.30 वा. |

**शैक्षणिक अर्हताः-** उमेदवार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. तसेच मान्यताप्राप्त विद्यापीठातून संबंधित विषयातील पदव्युत्तर पदविका, (एम.डी. पदवी किंवा डी.एन.बी किंवा एम.एस.) असणे आवश्यक आहे.

सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या जसे की, शैक्षणिक (गुणपत्रिका व प्रमाणपत्रे), एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, मराठी विषय घेऊन एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण, इत्यादीच्या प्रमाणित प्रती लिपी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

<u>अनुभवः-</u> मान्यता प्राप्त वैद्यकीय महाविद्यालयातील (निवासी/रजिस्ट्रार/डेमॉन्स्ट्रेटर/टयूटर) म्हणून तीन वर्षांचा शिक्षक पदाचा अनुभव असावा.

सदर नियुक्ती कंत्राटी तत्त्वावर एकावेळी चार महिन्यापेक्षा जास्त नाही, इतक्या कालावधीकरीता, प्रत्येक चार महिन्यानंतर एक दिवस सेवाखंड देऊन पुनर्नेमणूक अथवा महानगरपालिका वैद्यकीय निवड मंडळामार्फत (M.M.S.S. Board) अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर होईल अशा स्वरुपात करण्यांतयेईल.

<u>वयाची अटः-</u>सर्वसाधारण उमेदवाराकरीता वय 18 वर्षांपेक्षा कमी व 38 वर्षांपेक्षा अधिक न सावेव मागासवर्गीयांकरीता 43 वर्षांपेक्षा अधिक नसावे.

<u>वेतनश्रेणी:-</u> उमेदवाराचे ठोक मासिक वेतन रुपये 1,00,000/- ( एक लाख रूपये फक्त )असे असेल.

सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटीतत्त्वावर असल्यामुळे नियुक्त करण्यात येणा-या उमेदवारांना निवृत्तीवेतन योजना व भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 व मुंबईमहानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होणारनाही.

1. जे उमेदवार म.न.पा. सेवेत असतील त्यांनी अर्जभरण्याकरीता त्यांच्या खाते प्रमुखांची नाहरकत प्राप्तकरणे आवश्यक आहे.
2. उमेदवाराने अर्जावर पासपोर्ट आकाराचा फ़ोटो लावावा व त्यावर त्यांनी उपलब्ध जागेत स्वाक्षरी करावी.
3. उमेदवाराने अर्जावर भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा.
4. उमेदवारांनी मुलाखातीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे.
5. उमेदवारांनी सध्या ते कार्यरत असलेल्या संस्थेचे नाहरकतप्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
6. उमेदवारांनी त्यांच्या अर्जात (MMC / MCI) चा नोंदणी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.
7. PROFESSIONAL INDEMNITY POLICY

उमेदवारांनी मुख्यलिपिक (रोख) यांचेकडून दिनांक 01.08.2023 पासून ते दि. 08.08.2023 पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी 11.00 पासून ते दुपारी 3.30 पर्यंत) अर्ज प्राप्त करता येतील व अर्ज जमा करण्याची अंतिम दिनांक 08.08.2023 संध्याकाळी 04:30 वा. पर्यंत .

<u>अर्ज विक्री शुल्क रु.580 + जी.एस.टी.(18 % GST)</u>

Sd/-01.08.2023
अधिष्ठाता
लो.टि.म.स.रूग्णालय, शीव.

**बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुख वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या आस्थापनावरील व्यवसायोपचारशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक या पदांच्या सेवा प्रवेश नियमांना शासनाची मान्यता.**
**महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग**

**<u>शासन निर्णय क्रमांक – बीएमसी-2419/प्र.क्र.343/नवि-21 मंत्रालय, मुंबई - 400 032</u>**
**दिनांक 08 जानेवारी 2021**

**(शासन निर्णय नगर विकास क्रमांक, दिनांक 08 जानेवारी 2021 बीएमसी-2419/प्र.क्र.343/नवि-21, दिनांक 08 जानेवारी2021 वे विवरपत्र “अ”)**
**<u>“बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुख वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या आस्थापनेवरिल व्यवसायोपचारशास्त्र विभागातील ‘सहाय्यक प्राध्यापक’ या पदाचे सेवा प्रवेश नियम”</u>**
**<u>सदर पद खालील अर्हताधारक असणा-या उमेदवारांकडून निवडीने भरण्यात येईल.</u>**

1.उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत नसल्यास उमेदवाराचे वय 38 अधिक नसावे मागासवर्गीयांसाठी वय 43 वर्षापेक्षा अधिक नसावे.
2.उमेदवार मान्यता विद्यापीठाच्या व्यवसायोपचार विषयातील पदवी (B.O. Th./B.Th.O/B.Sc. O.T. / B.O.T.) सह पदव्युत्तर पदवी, (M.Th.O./M.Sc.O.T./M.O.T.) किमान 55% गुणांसह किंवा बिंदुनामांकाप्रमाणे समतुल्यश्रेणी धारण करणारा असवा.
3.या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवाराने मराठी भाषा परिक्षा अगोदगच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळालेली नसेल तर त्याने सदर परिक्षा प्रचलित धोरणानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.
4.या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवाराने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी किंवा वापरण्याबाबबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहिल.

**सही/-01.08.2023**
**अधिष्ठाता**
**लो.टि.म.स.रु. व वै.म.,शीव,मुंबई-22**